सत्यमेव जयते

राज्य निवडणूक आयोग

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक :रानिआ/रापनों-२०१५/ प्र.क्र.१६ /का-११
नवीन प्रशासकीय भवन , हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा मार्ग, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : ०९/१०/२०१५

## आदेश

ज्याअर्थी, राज्य निवडणूक आयोगाच्या क्रमांक : रानिआ/रापनों-२०१५/ प्र.क्र.०१ /का-११, दि. १५.०९.२०१५ च्या आदेशान्वये स्वाभिमानी पक्ष या राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणीकृत पक्षाची नोंदणी रद्द करण्यात आली आहे,

आणि ज्याअर्थी, स्वाभिमानी पक्षाने त्यांच्या दि. १९.०९.२०१५ च्या पत्रान्वये काही कागदपत्रांची पूर्तता केली केली असून त्यापक्षाची नोंदणी रद्द करण्याच्या निर्णयाचा फेर विचार करण्याची विनंती केली आहे,

आणि ज्याअर्थी, त्यांच्या अर्जावर आयोगाने विचार करून , उक्त पक्षाने आयोगाच्या आदेशाकडे दुर्लक्ष केले या कारणास्तव रु. १.०० लाख ( रूपये १ लाख ) दंड आकारून त्यांची नोंदणी रद्द करण्याच्या आदेशाची अंमलबजावणी दि. ३१ डिसेंबर, २०१५ पर्यंत थांबविण्याचा व दि. ३१ डिसेंबर, २०१५ पर्यंत सर्व कागदपत्रे सादर केली नाहीत तर त्या पक्षाची नोदंणी आपोआप रद्द होईल असा निर्णय घेतला आहे,

आणि ज्याअर्थी, उक्त राजकीय पक्षास हा निर्णय समक्रमांकाच्या दि. ०६.१०.२०१५ च्या पत्रान्वये कळविण्यात आला आहे,

आणि ज्याअर्थी, उक्त पक्षाने त्यांच्या दि. ०७.१०.२०१५ च्या पत्रान्वये रू. १ लाख चा धनाकर्ष क्र. ५२७७२, बॅक ऑफ इंडिया , दि. ०७.१०.२०१५ आयोगाकडे जमा केला आहे,

त्याअर्थी, स्वाभिमानी पक्षाची नोंदणी रद्द करण्याबाबतच्या दि. १५.०९.२०१५ च्या आदेशाची अमंलबजावणी दि. ३१, डिसेंबर, २०१५ पर्यंत थांबविण्यात येत आहे. जर उक्त पक्षाने दि. ३१ डिसेंबर, २०१५ पर्यंत सर्व कागदपत्रे सादर केली नाहीत तर त्या पक्षाची नोंदणी आपोआप रद्द होईल.

राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

9-10-2015
(डॉ. प्रदीप व्यास)
सचिव ,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र.

प्रति,

अध्यक्ष / सचिव,
स्वाभिमानी पक्ष ,
ग.नं ९,जयसिंगपूर,
ता.शिरोळ जि.कोल्हापूर-४१६१०१ .

प्रत,

१. सर्व जिल्हाधिकारी,
२. आयुक्त, महानगरपालिका (सर्व)
३. राज्य निवडणूक आयोग, कार्यासन -३, (रोखशाखा) (धनाकर्षासह)
४. राज्य निवडणूक आयोगातील सर्व कार्यासने.